**एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ नुसार राज्ययोजनेंतर्गत स्वयंचलित रिलिंग मशीन/ मल्टीएन्ड रिलींग मशिन/ व्टिस्टींग युनीट करिता शेड उभारण्यास अनुदान देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्र.सपववि-४००१३/१२/२०२३ -DESK SERICULTURE-CMTD**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ०७ मार्च, २०२४

**वाचा:-** सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र धोरण २०२३/ प्र.क्र.११/ टेक्स-५, दि.०२ जून, २०२३.

**प्रस्तावना:-**

रेशीम उद्योग हा कृषि व वनसंपत्तीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. राज्यातील हवामान हे रेशीम शेतीसाठी पोषक आहे. वातावरणाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच नियमित व हमखास उत्पन्न मिळविण्यासाठी रेशीम उद्योग हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. शेतकऱ्यांना तसेच रेशीम उद्योजकांना चालना देण्यासाठी दि.०२ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मधील परिच्छेद ७.७ ई नुसार स्वयंचलित रिलिंग मशीन/ मल्टीएन्ड रिलींग मशिन/ व्टिस्टींग युनीट करिता शेड उभारण्यास अनुदान देय करण्यासाठी राज्य योजना घोषित करण्यात आली आहे.

रेशीम उद्योगामध्ये रोजगार निर्मितीला असणारा वाव विचारात घेता रेशीम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी व चालना मिळण्यासाठी कोषोत्तर प्रक्रिया करणाऱ्या रेशीम उद्योगातील स्वयंचलित रिलिंग मशीन/ मल्टीएन्ड रिलींग मशिन/ व्टिस्टींग युनीट स्थापन करणाऱ्या उद्योजकांना सदर मशिनरीसाठी शेड उभारण्यास अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

राज्यातील रेशीम उद्योगाच्या विकासासाठी राज्यात उत्पादित होणाऱ्या कोषावर प्रक्रिया करून धाग्यापर्यंत निर्मिती होण्यासाठी स्वंयचलित रिलींग मशिन/मल्टीएन्डस् रिलींग मशिनरी /व्टिस्टींग मशिनरीकरीता पात्र लाभार्थ्यांना शेड उभारणीसाठी खालीलप्रमाणे अनुदान देण्यास शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | तपशिल | शेड बांधकाम क्षेत्रफळ (स्के.फुट) * | शेड अनुदानाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | स्वयंचलित रिलींग मशिन (अेआरएम) (किमान ४०० एन्डस् किंवा ४० बेसिन) करीता शेड उभारणी | १०००० | डीएसआर दरानुसार इमारत बांधकाम करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे ५० टक्के किंवा ₹४०.०० लक्ष यापैकी जे कमी असेल तितके अनुदान देण्यात येईल. |
| २. | स्वंयचलित रिलींग मशीन (अेआरएम) (किमान २०० एन्डस् किंवा २० बेसिन) करीता शेड उभारणी | ६००० | डीएसआर दराच्या ५० टक्के किंवा ₹२०.०० लक्ष यापैकी जे कमी असेल तितके अनुदान देण्यात येईल. |
| ३. | स्वंयचलित रिलींग मशिन (अेआरएम) (किमान १२० एन्डस् किंवा १२ बेसिन) करीता शेड उभारणी | ४००० | डीएसआर दराच्या ५० टक्के किंवा ₹१५.०० लक्ष यापैकी जे कमी असेल तितके अनुदान देण्यात येईल. |
| ४. | मल्टीएन्डस् रिलींग मशिन (किमान १०० एन्डस् १० बेसिन) करीता शेड उभारणी | १५०० | डीएसआर दराच्या ५० टक्के किंवा ₹३.०० लक्ष यापैकी जे कमी असेल तितके अनुदान देण्यात येईल. |
| ५. | व्टिस्टींग मशिन करीता शेड उभारणी | ३००० | डीएसआर दराच्या ५० टक्के किंवा ₹६.०० लक्ष यापैकी जे कमी असेल तितके अनुदान देण्यात येईल. |

(*सदर शेड बांधकामाचे क्षेत्रफळ हे केंद्रीय रेशीम महामंडळ, बेंगलुरू यांनी दिलेल्या निकषानुसार घेण्यात आलेले आहेत.)

## २. लाभार्थी अर्हता:-

- वैयक्तिक लाभार्थी.
- कंपनी.
- सहकारी संस्था.
- बचत गट.
- अशासकीय संस्था.

## ३. लाभार्थी निवडीचे निकष:-

- रेशीम उद्योगाशी निगडीत क्षेत्रातील वैयक्तिक लाभार्थ्यांनी स्व:निधीतून स्वंयचलित रिलींग मशिन/मल्टीएन्डस् रिलींग मशिनरी /व्टिस्टींग मशिनरी उभारणारे आवश्यक.
- सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी स्वंयचलित रिलींग मशिन/मल्टीएन्डस् रिलींग मशिनरी /व्टिस्टींग मशिनरी उभारणारे आवश्यक.

- वैयक्तिक लाभार्थी यांना स्वयंचलित रिलींग मशिनचे कामकाजाबाबत केंद्रीय रेशीम मंडळाकडील प्रशिक्षण अनिवार्य.
- कंपनी, सहकारी संस्था,बचत गट व अशासकीय संस्था यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीस स्वयंचलित रिलींग मशिनचे कामकाजाबाबत केंद्रीय रेशीम मंडळाकडील प्रशिक्षण अनिवार्य.

**४. शेड बांधकाम योजना राबविण्याबाबतची कार्यपध्दती:-**

- सदर योजनेबाबत वस्त्रोद्योग विभागाच्या व रेशीम संचालनालयाच्या संकेतस्थळावर तसेच विविध माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.
- अर्हताप्राप्त असलेले लाभार्थ्यांनी शेड अनुदानासाठी सविस्तर प्रकल्प अहवालासह विहीत नमुन्यात अर्ज संबंधित जिल्हा रेशीम कार्यालयास सादर करावा. **(नमुना प्रपत्र-१)**
- रेशीम विकास अधिकारी यांनी प्राप्त अर्जाची छाननी करून अर्ज शेड अनुदान मंजूर करण्याच्या अनुषंगाने गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीकडे पाठवावे.

**५. राज्यस्तरीय समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे:-**

**समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| १) संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर | - | अध्यक्ष |
| २) उपसंचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर | - | सदस्य सचिव |
| ३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर | - | सदस्य |
| ४) केंद्रीय रेशीम विकास मंडळ, बेंगलुरू यांचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| ५) उपसचिव (रेशीम), सहकार, पणन व वस्त्रोद्योग, मंत्रालय | - | निमंत्रित सदस्य |

**६. राज्यस्तरीय समितीची कार्यपध्दती:-**

- राज्यस्तरीय समितीने लाभार्थ्यांच्या अर्जावर पात्र / अपात्रतेबाबत निर्णय घेऊन निवड करावी.
- लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त अनुदानापेक्षा जास्त रक्कमेचे प्राप्त झाल्यास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (First come first served) या तत्वावर निवड करण्यात यावी. उर्वरित पात्र लाभार्थ्यांची प्रतिक्षायादी (निवडसूची) तयार करण्यात यावी.

७. राज्यस्तरीय समितीने लाभार्थ्यांची निवड केल्यानंतर संबंधित लाभार्थ्यास मंजूरी पत्र द्यावे. **(नमुना प्रपत्र-२)**

८. लाभार्थ्यांचे बांधकाम पूर्ण झाल्यावर स्वयंचलित रिलींग मशिन/मल्टीएन्डस् रिलींग मशिनरी /व्टिस्टींग मशिनरी उभारणी करून कार्यान्वित केल्याबाबतचा स्थळपाहणी अहवाल अनुदानाच्या शिफारशींसह तसेच पात्र लाभार्थ्याने रेशीम कोषावर प्रक्रिया करून रेशीम धागा निर्मिती केल्याबाबतची कागदपत्रे जिल्हा रेशीम कार्यालयांमार्फत शेड अनुदानाच्या मागणी प्रस्तावासह संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करावा. सदर प्रस्तावाची पडताळणी करून संचालक (रेशीम) यांनी पात्र लाभार्थ्यांना अनुदान देण्यासाठी निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

**९. अनुदान वितरीत करण्याबाबतची कार्यपध्दती:-**

- लाभार्थ्यांना शेड बांधकामासाठी अनुदान रक्कमेच्या मर्यादेत वित्तीय संस्थेने कर्ज मंजूर केल्यानंतर लाभार्थ्यांना देय असलेले अनुदानाची रक्कम बॅकेकडे जमा करावी अथवा लाभार्थ्यांने स्व:निधीतून शेडची उभारणी केल्यास अनुदानाची रक्कम संबंधित लाभार्थ्याच्या संबंधित आर्थिक वर्षात (निधी उपलब्धतेनूसार) डीबीटी प्रणालीद्वारे लाभार्थ्यास आधार संलग्न बँक खात्यात अदा करण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.
- सदर योजनेच्या आर्थिक निकषाच्या अधिन राहून योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी आवश्यक त्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचना संचालक (रेशीम) यांच्या स्तरावरून क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात याव्यात.

१०. सदर योजनेचा लाभ शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहील.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३०७१०५८०६८२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRADDHA DEVEN KOCHAREKAR

Digitally signed by SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=189da489d797e1e6a67b7d97496ef70683916299eab51c867c5a13147d142a80, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CC51883E2B27843640CD6C07C96E3E8715CC5BFBE554420E4D68E5F4B112388A, cn=SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
Date: 2024.03.07 11:07:48 +05'30'

**( श्रध्दा कोचरेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन,**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह, विधी व न्याय) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त विभाग) यांचे प्रधानसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांचे खाजगी सचिव.
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधान भवन, मुंबई.
८. सर्व माननीय संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
९. मा.समितीप्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
११. मा.सदस्य सचिव, केंद्रीय रेशीम मंडळ, बेंगलुरू.
१२. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
१३. सर्व विभागीय आयुक्त.
१४. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना, नागपूर.

१५. सर्व जिल्हाधिकारी.

१६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

१७. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई.

१८. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर.

१९. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी), बाह्य लेखापरिक्षा विभाग (नागरी), मुंबई.

२०. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.

२१. उपसंचालक/सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, नागपूर / अमरावती / औरंगाबाद /पुणे.

२२. सर्व कोषागार अधिकार.

२३. सर्व रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१/श्रेणी-२.

२४. निवड नस्ती.

# प्रपत्र -१

## राज्य योजनेंतर्गत स्वयंचलित रिलींग मशिनरी/ मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी/ ट्विस्टींग मशिनरी उभारणाऱ्या लाभार्थ्यांकरीता शेड अनुदानासाठी अर्ज

---

(प्रत्येक घटकासाठी स्वंतत्र अर्ज करावा)

प्रति,

रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१/ श्रेणी-२

जिल्हा रेशीम कार्यालय--------------

| पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र |
|---|

विषय :- **राज्य योजनेंतर्गत स्वंयचलित रिलींग मशिनरी(ARM)/ मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी ( MRM) / ट्विस्टींग मशिनरी ( Twisting Machinery) युनिटसाठी शेड अनुदान लाभमिळणेबाबत....**

**महोदय,**

स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१० एन्डस् ) / ट्विस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल) मी खरेदी करणार करणार आहे.

किंवा

केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत मला स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१०० एन्डस् ) / ट्विस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल) मंजूर झाली आहे.

किंवा

पोखरा /जिल्हा वार्षिक योजनेतून / स्मार्ट (स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे ॲग्रीबिझनेज ॲण्ड रूरल ट्रान्सफर्मेशन प्रकल्प) योजनेतून मला स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१०० एन्डस् ) / ट्विस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल) मंजूर झाली आहे.

किंवा

स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१० एन्डस् ) / ट्विस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल)कंपनी ........ (कंपनीचे नाव) खरेदी करणार आहे.

किंवा

स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१० एन्डस् ) / ट्विस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल) सहकारी संस्था ........ (सहकारी संस्थेचे नाव) खरेदी करणार आहे.

किंवा

स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१० एन्डस् ) / ट्विस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल) बचतगट ........ (बचत गटाचे नाव) खरेदी करणार आहे.

किंवा

स्वंयचलित रिलींग मशिनरी (४००एन्डस् /२०० एन्डस् /१२० एन्डस्) / मल्टीएंन्ड रिलींग मशिनरी (१० एन्डस् ) / व्हिस्टींग मशिनरी (४८० स्पिंडल) अशासकीय संस्था ........ (संस्थेचे नाव) खरेदी करणार आहे.

मी/माझी कंपनी/सहकारी संस्था/बचत गट/अशासकीय संस्था एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत स्व:मालकीच्या किंवा लीजवर घेतलेल्या जागेवर राज्य योजनेंतर्गत शेड बांधकाम करण्यास व त्याकरिता आवश्यक गुंतवणूक करण्यास तयार आहे. या योजनेंतर्गत लाभ मिळावा, ही विनंती.

लाभार्थ्याचे नाव :- ------------------------------

लाभार्थ्याचा तपशिल :- --------------------------

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | लाभार्थ्याचे नाव | |
| २ | पूर्ण पत्ता | गाव ------------- पोस्ट----------<br>तालुका----------- जि.-----------<br>पिन क्र.-------------------------- |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | -------------------- |
| ६ | जात प्रवर्ग (लागू असेल तेथे ✔खूण करावी) (वैयक्तिक लाभार्थ्यांकरीता आवश्यक) | अजा ☐ अज ☐ इतर ☐ |
| ७ | अर्जदार दिव्यांग आहे काय ( लागू असेल तेथे ✔खूण करावी) (वैयक्तिक लाभार्थ्यांकरीता आवश्यक) | होय ☐ नाही ☐ |
| ९ | आधारकार्ड क्रमांक / कंपनीचे पॅन क्रमांक / टॅन /जी.एस.टी क्रमांक | --------------------- |
| १० | ज्या जागेवर युनिट उभारणार आहे त्या जागेचा सर्व्हे नं./ गट क्रमांक | सर्व्हे नं./ गट क्रं.----------<br>गाव--------- तालुका-------<br>जि.------------पिन क्र.----------------------- |
| ११ | जागेचे क्षेत्रफळ | --------- स्के.फुट |
| १२ | शेड उभारणीसाठीची जागेच्या मालकी हक्क/लीजबाबतचा तपशिल | ------------- ( स्वत: /लीज) |
| १३ | स्वंयचलित रिलींग मशिन / मल्टीएंन्ड रिलींग/ व्हिस्टिंगबाबतचा प्रशिक्षण तपशिल. | संस्थेचे नाव --------------<br>कालावधी ------------- |
| १६ | बॅकेचा तपशिल | बॅकेचे नाव -------------<br>खाते क्रमांक ----------------- |

| | | |
|---|---|---|
| | | बॅकेच्या शाखेचे नाव -----------<br>आयएफएससी कोड ----------- |
| १७ | मागणी केलेल्या घटकाचा एकूण अंदाजित खर्च | ₹ ------------ |

सदर घटकासाठी माझी/माझी कंपनी/सहकारी संस्था/बचत गट/अशासकीय संस्था निवड झाल्यास मार्गदर्शक सुचनेनुसार आवश्यक कागदपत्राची पूर्तता विहीत मुदतीत करेन.

सदरची कामे माझी/माझी कंपनी/सहकारी संस्था/बचत गट/अशासकीय संस्था विहीत मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केल्यास अनुदान मिळणार नाही याची मला जाणीव आहे.

स्वयंचलित रिलींग मशिन/मल्टीएन्डस् रिलींग मशिनरी /व्टिस्टींग मशिनरी उभारणाऱ्या लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे शेड अनुदान अनुज्ञेय असल्याची मला जाणीव आहे. याकरिता सदर घटकांचा लाभ घेत असताना व त्यानंतर माझेकडून गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा अनुदानाचा गैरवापर झाल्याचे सिध्द झाल्यास संबधित घटकासाठी मिळालेले अनुदान महसुली पध्दतीने वसूल केले जाईल याची मला स्पष्ट जाणीव आहे.

प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना घटक तपासणीसाठी माझी संमती आहे. त्यांना या तपासणी कामांसाठी सहकार्य करेन.

वरील सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

ठिकाण :-

दिनांक :- (अर्जदाराचे नाव व सही)

**सोबत** :-

१) जागेच्या मालकी हक्काचे कागदपत्र( गाव नमूना क्र.७ (अ), ७/१२ व ८ अ उतारा)
२) जागा अकृषक/बांधकामास परवानगी असल्याचे प्रमाणपत्र
३) जागा लीजवर घेतली असल्यास नोंदणीकृत लीज करारनामा ( १० ते १५ वर्ष)
४) स्वयंचलित रिलींग / मल्टीएंन्ड रिलींग / व्टिस्टींग मशिनरी प्रकल्प सुरू करण्यासाठी ग्रामपंचायत/ नगरपंचायत /नगरपालिका/ महानगरपालिका ना हरकत प्रमाणत्र तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांनी वितरीत केलेल्या प्लॉटवर करणार असल्यास जागा वाटपाचे आदेश
५) केंद्रीय रेशीम मंडळाकडील रिलींग प्रशिक्षण प्रमाणपत्र
६) आधार कार्ड / मतदान कार्ड/ रेशन कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स / टॅन प्रमाणपत्र / जी.एस.टीप्रमाणपत्र/ पॅनकार्ड
७) जातीचे प्रमाणपत्र ( अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती)
८) राष्ट्रीयकृत बँकपासबुक पहिल्या पानाची प्रत
९) बॅकेचे स्टेंटमेंट
१०) बँकेचे कर्ज घेतले असल्यास बॅकेचे मंजूरीपत्र
११) शेड बांधकाम नकाशा, अंदाजपत्रक व मुल्यांकन दाखला.
१२) प्रस्तावित जागेचा स्थळदर्शक नकाशा

# प्रपत्र -२
# संमतीपत्र

जा.क्र.-------------------
कार्यालय- रेशीम संचालनालय, नागपूर
दिनांक :-------------

प्रति
श्री/ श्रीमती---------------------------------
मु.पो---------------------------
ता.----------------------- जि.----------------------

आपल्या दिनांक ---------------------- रोजीच्या अर्जाप्रमाणे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत राज्य योजनेंतर्गत मार्गदर्शक सुचनेप्रमाणे --------------------(स्वयंचलित रिलींग मशिनरी ४००/२००/१२० / मल्टीएंन्ड मशिनरी १०० /व्टिस्टींग मशिनरी ४८० ) उभारणीसाठी शेड बांधकाम करण्यास संमती देण्यात येत आहे.

लाभार्थी/कंपनी/सहकारी संस्था/बचत गट/अशासकीय संस्था यांना स्वयंचलित रिलींग / मल्टीएंन्ड रिलींग / व्टिस्टींग मशिनरी उभारणीच्या किंवा केंद्रीय रेशीम मंडळ सिल्क समग्र -२ योजनेंतर्गत (स्वयंचलित रिलींग मशिनरी ४००एन्डस्/२००एन्डस्/१२० एन्डस्/ मल्टीएंन्ड मशिनरी १००एन्डस् /व्टिस्टींग मशिनरी ४८० स्पिंन्डल) उभारणीच्या अधिन राहून शेड उभारण्यासाठी संमती देण्यात येत आहे.

प्रकल्प उभारणीसाठी शेड बांधकाम पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपणास शासन निर्णयानूसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी) अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात येईल. तसेच, सदरचे अनुदान स्वनिधीतून उभारल्यास आपल्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. तसेच, बँकेकडून अर्थसहाय्य घेवून शेड बांधकाम उभारल्यास अनुदानाची अनुज्ञेय रक्कम बँकेकडून बँकेस जमा करण्यात येईल.

संचालक (रेशीम)
रेशीम संचालनालय,
नागपूर

**प्रत** -
१. सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, ---------
२. रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१/ श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, ---------